# अहरोन आणि उपासनेचे इतर पुढारी

मुलांना शिकवणाऱ्यांनी W2b हा अभ्यास वाचावा

**पार्श्वभूमी.** इस्राएलाचा पहिला मुख्य याजक आहरोन होता. तो माशे चा भाऊ होता. लोकांच्या पापांकरीता अहरोन देवाला अर्पणे करीत असे. तो देवाने अन्न म्हणून मान्यता दिलेले इतर 'शुध्द' पशू, निर्दोष नर आणि मेंढया अर्पण करीत असे. तो त्यांच्या गळयांवर सुरा चालवत असे आणि पापांसीठाचे प्रायाश्चित्त म्हणून त्यांचे होमार्पण करीत असे. आज, येशू हा आमचा 'देवाचा काकरा' आहे. तो निष्पाप, दोष विरहीत असा असून आमच्या पापांसाठीचे प्रायाश्चित्त म्हणून तो वधला गेला.

## 1. तुमच्या मंडळीला योग्य उपासना करण्यास साहाय्य करण्याकरीता तयारी करा उपासनेचे सात मुख्य घटक शिका

बहुतेक सर्व मंडळया उपासनेचे हे सात सामान्य घटक आचरणात आणतात कदाचित ह्यांचा उपयोग ते तुमच्यापेक्षा वेगळया पध्दतीने व क्रमाने करत असतील काहीजण दर आठवडयात करतात तर इतर त्याहीपेक्षा कमी वेळात करतात



1) स्तुती व उपकार स्मरण
2) प्रार्थना
3) वचन शिकणे
4) दान देणे
5) आपली पापे कबूल करून देवाच्या क्षमेची खत्री करून घेणे
6) भाकरी मोडणे (प्रभुभोजन)
7) सहभागितेचा आनंद लुटणे

- लूक 6:38 मध्ये येशूने उपासनेच्या कोणत्या कृती विषयी आज्ञा दिली आहे?
- अब्राहामने उत्पत्ती 18:20–33 मध्ये कशी उपासना केली?
- 2 शमूवेल 22:47 मध्ये दावीद?
- नहेम्या 8:1–3 मध्ये इस्राएल लोक?
- नहेम्या 9:2 मध्ये इस्राएल लोक?
- निर्गम 12:1–14 मध्ये कोणत्या कृतीचे उदाहरण दिले आहे?
- स्तोत्र 133 मध्ये तुम्हांला कोणती कृती आढळली?

*(उतरे: 1) दान देणे 2) प्रार्थना 3) स्तुती 4) देवाचे वचन 5) पापांची कबूली 6) प्रभुभोजन 7) सहभागिता)*

देवाच्या लोकांनी शतकानुशतके उपासनेच्या ह्या कृती आचरणात आणल्या.

- येशू ह्या जगात येण्यापूर्वी यहूदी लोक त्यांच्या सभास्थानांमध्ये उपासनेची हिच पध्दत वापरत होते.
- हया गोष्टिंना येशू व पवित्र आत्म्याने नव्या करारात अधिक सखोल अर्थ दिला.
- येशूचे यज्ञपिठात्मक मरण आणि जीवन देणारे पुनरूत्थान यावर प्रेषितांचे शिक्षण केंद्रित होते.
- प्रे.कृ. 2 मधील यरुशलेमच्या मंडळीपासून ख्रिस्ती लोकांनी उपासनेचे हे विधी नेहमीच दुराचरणात आणले आहेत.
- संपूर्ण इतिहासात, देवाने सांगितल्याप्रमाणे उपासना करणाऱ्या मंडळया टिकून राहिल्या आणि त्यांचा छळ होत असतानाही त्या बहुगुणित झाल्या.

- देवाने सांगितल्याप्रमाणे उपासना करण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या मंडळयांवर मनुष्याने हल्ला केला किंवा खोट शिक्षण मिळाले तेव्हा त्यांचा हळूहळू नाश झाला किंवा त्या पूर्णपणे नष्ट झाल्या.
- काही मंडळया ह्या गोष्टी औपचारिक 'उपासनानिष्ठ' पध्दतीने, झगा,धूप आणि गुणगुण करतात. इतर लोक 'स्वतंत्र' पध्दतीने त्या करतात.
- शास्त्रलेखामध्ये लोक गाणे गाऊन, नाच करून, टाळया वाजवून, गुडघे टेकून, चेहरा खाली करून, शांतपणे, आवाज करून, साक्ष देऊन,नाटिकेतून, चिन्हांच्या द्वारे सुरावर बोलून आणि अर्पण करून देवाची स्तुती करीत. उपासना अंत:करण पूर्वक केली जात आहे ह्याला देवाच्या दृष्टीने महत्त्व आहे बाहय उपचारांकडे तो लक्ष देत नाही.
- देवाची स्तुती करण्यास सुरूवात करतांना बहुतेक मंडळया स्तोत्र वाचतात किंवा गातात. तुम्हांला देव आणि त्याची कृत्ये, सामर्थ्य, न्याय, प्रीती, दयाळूपणा, विश्वासूपणा व पवित्रता यासाठी त्याचे गौरव करणारी वचने यावर केंद्रित वचनांचा उपायोग करता येईल.
- देवाची स्तुती करण्यास साहाय्यक ठरणारी काही वचने स्तोत्रसंहितेच्या पुस्तकातून पुढे दिली आहेत:

| | | | |
|---|---|---|---|
| 8:1 | 66:1-4 | 98:1-3 | 111:1-4 |
| 9:1-2 | 81:1-2 | 100:1-3 | 117:1-2 |
| 29:1-2 | 93:1-2 | 103:1-6 | 136:1-26 |
| 47:1 | 95:1-3 | 106:1-2 | 148:1-14 |

2. **आठवडयातील कार्यक्रमांविषयी सहकाऱ्यांबरोबर योजना आखा तुमच्या मंडळीच्या गरजांनुसार कार्यक्रम निवडा.**

नव्या लोकांना उपासनेनंतर जेवायचं आमंत्रण द्या.

- 
- ज्यांनी अद्याप मंडळीच्या उपासना सभेत भाग घेतला नाही त्यानांही मुलांची नाटिका करण्यास साहाय्य करण्यास मोठया मुलानी सांगा.
- सभेत लावण्यासाठी उपासनेचे शब्द लिहिलेले फलक तयार करा.
- जे अद्याप मंडळीच्या उपासनेला आले नाहीत अशा मित्रांच्या घरी जाऊन प्रार्थना व देवाची स्तुती करा.


3. **आगामी उपासने विषयी सहकाऱ्यांबरोबर योजना आखा.**

प्रसंग आणि स्थानिक रिवाज ह्यांना अनुरूप कार्यक्रम निवडा.

- एका स्तोत्रातील वचने वाचून किंवा गाऊन देवाची प्रार्थना व स्तुती करा.
- गेल्या आठवडयातील कार्यक्रमांचे अहवाल आणि साक्षी देण्यास सांगा.

येशु ह्या जागात येण्यापूर्वी उपासना कशी होती याचे प्रात्यक्षिक दाखवा:

- तुम्ही जुन्या करारातील उपासनेचे प्रात्यक्षिक करणार आहात हे स्पष्ट करा.
- एका मदतनीसाला तुमच्या बरोबर बाहेर न्या, आणि तुम्ही परत याल तेव्हा तो ओणवून चालणारी, तोंडाने 'बे,बे' आवाज करणारी मेंढी म्हणू येईल. त्याला दोरोने बांधून ओढत आणण्याचा अभिनय करा.
- ''अहरोन'' (कोणा एकाला)आपल्या सुरीला धार लावायाला सांगा, अग्नीतयार करा आाणि मेंढीला वेदीवर ठेवून बांधा. अहरोनाच्या मदतीने, मेंढीला खुर्चीवर डोके खाली करून ठेवा.



इस्त्राएल लोकांची घडलेल्या पापार्पणांची वेदी

- तुमचे हात मेंढीच्या डोक्यावर ठेवून म्हणा, ''मी, माझी आणि माझ्या कुटुंबियांची पातके कबूल करतो!''
- अहरोनाला त्याच्या गळयावर सुरी फिरवायाला सांगा.तो असे करण्याचा अभिनय करतांना त्याचे रक्त तुमच्या आंगावर उडाल्यासारखे दाखवा, तुमचे होत झटकून मोठयाने म्हणा,''अरेरे! सगळीकडे रक्तच रक्त आले!''''त्या घराबरलेल्या प्राण्याचे करूण ओरडणे ऐका!''

  ''रक्ताचा आणि घाणीचा वास येतो!''

  ''तुमच्या डोळयात धूर जात आहे।''
- लोकांना विचारा: ''यालाच उपासना म्हणायचे का'' (त्यांना उत्तर देऊ द्या)
- ''हे धक्कादायक आणि तिटकारा आणणारे आहे! का? आमच्या पापांमुळे परमपवित्र देवालाही धक्का बसतो आणि तिटकारा वाटतो. यामध्ये आजही फरक -बदल झालेला नही. आमची पापे झाकण्यासाठी अद्यापही देवाला निर्दोष रक्ताची गरज आहे''
- **विचारा:** आज, आपण आपल्या सभां मध्ये बकरी- मेंढी का नेत नाही?''विश्वासणाऱ्यांना उत्तर देऊ द्या. त्यांना बरोबर उत्तर देता आले नाही तर तुमच्या शब्दांत स्पष्ट करा:''जगाचे पापहरण करणारा येशू हा देवाचा साार्वकालिक कोकरा आहें आम्ही प्रभुभोजनाची भाकरी व प्याला सेवन करतो तेव्हा आम्ही देवाच्या पवित्र कोकाऱ्याच्या शरीरात व रक्तात सहभागी होतो, 1 करिंथ 10:16 मध्ये हेच सांगितले आहे.

मुलांना, त्यांनी सराव केलेली नाटिका सादर करण्यास आणि मोठया माणसाना विचारावयाचे प्रश्न तयार करण्यास सांगा.

प्रभुभोजनाची ओळख करून देण्यासाठी, व्यवस्थित कपडे न करता राजाच्या लग्नाच्या मेजवानीला आलेल्या माणसाचा कथावृत्तांत्त सांगा (मत्तय 22:1-14) देव आपल्या पावित्र्याने आम्हा विश्वासणऱ्यांना झाकून घेतो हेच विशेष-खास पोषाखातुन दिसते. आम्ही आमची पापे कबूल करून देवाची पापक्षमा मिळवतो त्या त्या प्रत्येकवेळी आम्ही देवाचे कपडे परिधान करतो. प्रभुभोजन घेण्यापूर्वी आम्ही असे करणे अगत्याचे आहे. आमचा, देवाच्या लोकांचा सर्वकाळसाठी ख्रिस्ताशी विवाह होणार आहे त्या महान मेजवानीची चुणूक प्रभुभोजन घेताना दिसते.

**पाठ करा योहान 4:24**

आठवडयातील तुम्ही योजलेल्या कार्यक्रमांची घोषणा करा.

दोन वा तीन जणांचे गट करा एकमेकांना मदत करा. एकमेकांसाठी प्रार्थना करा, योजनांना अंतिम रुप द्या. एकमेकांना प्रोत्साहन द्या.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net